RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ८६(२)] शुक्रवार, जून ५, २०२६/ज्येष्ठ १५, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३०७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून, २०२६.

**अधिसूचना**

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्रमांक मुद्रांक-२०२६/प्र.क्र.१५१/मुद्रांक-२.—नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७८ च्या खंड (क) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, कलम ७८ अन्वये तयार केलेल्या आणि संलेखांच्या नोंदणीसाठी शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आरजीएन-१५५८/६७७३१-एन, दिनांक १७ जुलै, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) या अन्वये प्रसिद्ध केलेल्या शुल्काच्या तक्त्यामध्ये सुधारणा करीत आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ७९ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे ती पुढीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे :—

उक्त अधिसूचनेमध्ये, शुल्काच्या तक्त्यामधील, अनुच्छेद - एक मध्ये, नोंद ७३ नंतर, पुढील नोंद ७४ जादा दाखल करण्यात येईल :—

"**नोंद ७४.**—"मौजा गोधनी (रिठी) व मौजा लाडगाव (रिठी), तालुका हिंगणा, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेला नवीन नागपूर (आंतरराष्ट्रीय व्यवसाय व वित्त केंद्र) प्रकल्प" आणि नागपूर शहराभोवती स्थित असलेला नवीन बाह्यवळण रस्ता प्रकल्प जिल्हा नागपूर याकरिता खासगी वाटाघाटींद्वारे खासगी जमिनीची थेट खरेदी करण्याच्या प्रयोजनार्थ, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर आणि संबंधित पक्षकार यांच्यामध्ये निष्पादित केलेल्या विक्रीच्या किंवा भाडेपट्ट्याच्या संलेखावर, पुढील शर्तीस अधीन राहून, कोणतेही नोंदणी शुल्क आकारण्या योग्य असणार नाही".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 4th June, 20206.

*NOTIFICATION*

Registration Act, 1908.

No. RGN. 2026/C.R.151/Mudrank 2.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of sections 78 of the Registration Act, 1908 (XVI of 1908) (hereinafter referred to as "the said Act"), in its application to the State of Maharashtra and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby amends the Table of Fees prepared under section 78 and published under the Government Notification, Revenue and Forests Department No. RGN. 1558/67731-N, dated the 17th July 1961 (hereinafter referred to as "the said Notification") for registration of instruments and publishes the same as required by section 79 of the said Act, as follows :—

In the said Notification, in the Table of fees, in Article-I, after Note 73, the following Note 74 shall be added, namely :—

"*Note 74.*—No registration fee shall be chargeable on the instrument of the sale or conveyance executed between the Nagpur Metropolitan Region Development Authority, Nagpur and the concerned parties, for the purpose of direct purchase of private land through private negotiations for the "Naveen Nagpur Project (International Business and Finance Centre) situated in Mauja-Godhani (Rithi) and Mauja-Ladgaon (Rithi), Taluka- Hingna, District-Nagpur and New outer ring road project, District Nagpur".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून, २०२६.

### आदेश

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२६/प्र.क्र.१५१/मुद्रांक-२.—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, (अ) मौजा गोधनी (रिठी) व मौजा लाडगाव (रिठी), तालुका हिंगणा, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेला नवीन नागपूर प्रकल्प (आंतरराष्ट्रीय व्यवसाय व वित्त केंद्र) आणि (ब) नागपूर शहराभोवती स्थित असलेला नवीन बाह्यवळण रस्ता प्रकल्प, जिल्हा नागपूर याकरिता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि संबंधित पक्षकार यांच्यामधील जमिनीच्या हस्तांतरणासाठी निष्पादित केलेल्या संलेखावर उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद २५ अन्वये अन्यथा आकारण्यायोग्य असलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क, पुढील शर्तींस अधीन राहून, माफ करीत आहे :—

**शर्ती :—**

या अधिसूचनेखालील सूट, पुढील शर्तींच्या अधीन असेल :—

(एक) संलेख, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ३) अन्वये स्थापन केलेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एनएमआरडीए) नावानेच, केवळ निष्पादित करण्यात येईल ;

(दोन) संलेखामध्ये असे स्पष्टपणे विनिर्दिष्ट करण्यात येईल की, एकतर, हा व्यवहार, नवीन नागपूर (आयबीएफसी) प्रकल्पासाठी किंवा नवीन बाह्यवळण रस्ता प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्याशी संबंधित आहे ;

(तीन) या सवलतीचा लाभ, ही अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिवशी किंवा त्यानंतर निष्पादित केलेल्या संलेखांच्या बाबतीतच केवळ अनुज्ञेय असेल ;

(चार) या अधिसूचनेखालील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास किंवा लाभाचा गैरवापर केल्यास, दिलेली सूट प्रारंभापासून काढून घेण्यात येईल, आणि शास्तीसह मुद्रांक शुल्काची तूट, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, वसूल करण्यायोग्य असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 4th June, 2026.

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2026/C.R.151/Mudrank-2.—In exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the whole stamp duty as otherwise chargeable under Article 25 of the Schedule- I appended to the said Act, on the instrument of conveyance executed for transfer of land in between the Nagpur Metropolitan Region Development Authority (NMRDA) and the concerned parties for the (a) Naveen Nagpur Project (International Business and Finance Centre) situated in Mauja-Godhani (Rithi) and Mauja-Ladgaon (Rithi), Taluka Hingna, District Nagpur, and (b) New outer ring road project, District Nagpur subject to the following conditions, namely :—

**Conditions.—**

The remission under this notification shall be subject to the following conditions, namely :—

(*i*) the instrument shall be executed exclusively in favour of the Nagpur Metropolitan Region Development Authority (NMRDA) Constituted under the Maharashtra Metropolitan Region Development Authority Act, 2016 (Mah.III of 2017) ;

(*ii*) the instrument shall clearly specify that the transaction relates to acquisition of land for either Naveen Nagpur Project (IBFC) or New Outer Ring Road Project ;

(*iii*) the benefit of remission shall be admissible only in respect of instruments executed on or after the date of publication of this notification ;

(*iv*) in the event of breach of any condition or misuse of the benefit under this notification, the remission shall stand withdrawn *ab initio*, and the deficit stamp duty along with penalty, shall be recoverable in accordance with the provisions of the Maharashtra Stamp Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.